॥ कोर्ट ॥

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** तोफखाना

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0756 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/06/2024 22:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 19/06/2024
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/06/2024
**Time From (वेळेपासून):** 19:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/06/2024 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 082
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/06/2024 22:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महानगर पालिका अहमदनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किरण दगडु काळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नंबर 3334 परीस निवास, सावेडी नाका, मिडास सुझुकी शोर, सावेडी, अहमदनगर ,तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नंबर 3334 परीस निवास, सावेडी नाका, मिडास सुझुकी शोर, सावेडी, अहमदनगर ,तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पकज जावळे | | | 1. मुळ रामाजलगाव जिबिड, तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | श्रीधर आत्माराम देशपांडे | | | 1. बानेश्वर कलनी, बंगला क्रमांक, राममंदीरा समोर, बुऱ्हाणनगर,, अहमदनगर,तोफखाना, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**



Scanned with OKEN Scanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 27.06.2024
फिर्याद

मी किरण दगडु काळे वय 41 वर्ष व्यवसाय बांधकाम व्यवसायिक रा. प्लॉट नंबर 33+34 (परीस निवास) सावेडी नाका, मिडास सुझुकी शोरुम शाहुनगर, सावेडी, अहमदनगर मो.नं. 9049191515.

समक्ष पोलीस ठाणे तोफखाना जि.अहमदनगर येथे हजर राहून फिर्याद देतो की, मी दिनांक 19.06.2024 रोजी अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथे पोलीस उपअधीक्षक श्री.किरण बिडवे साहेबांकडे तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन माझ्या तीन मित्रासह 4 के रियाल्टी या नावाने बांधकाम व्यवसाय करतो. आम्ही त्यासाठी अहमदनगर महानगर पालिका हद्दीतील मौजे नालेगाव येथील सर्व्हे नं.1अ+1ब+6/3+10/1 मधील 2260.22 चौरस मिटरचे प्लॉट नंबर 12 ते 15/3 हे दिनांक 17/11/2023 रोजी दस्त क्रमांक 7129/2023 अन्वये विकत घेतलेले आहे.

आम्ही मित्रांनी मिळुन वर नमुद प्लॉटवर बांधकाम करण्याचे ठरविले. सदर प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी महानगर पालिका अहमदनगर येथील बांधकाम परवानगी आवश्यक असल्याने बांधकाम परवानगीसाठी आम्ही दिनांक 18/03/2024 रोजी महानगर पालिका अहमदनगर येथे ऑनलाईन अर्ज केला होता. सदर अर्जाचा क्रमांक 254531 असा असुन सध्या तो महानगर पालिका येथे आयुक्त पंकज जावळे यांच्या डेस्कवर परवानगीसाठी प्रलंबित आहे. मी दिनांक 11/06/2024 रोजी महानगर पालिका अहमदनगर येथे जावुन आयुक्त जावळे यांची भेट घेतली. त्यावेळी आयुक्त जावळे यांनी माझ्या बांधकाम परवानगीसाठी कर्मचारी श्रीधर उर्फ शेखर देशपांडे यांना भेटुन घ्या, ते जसं म्हणतील तसे त्यांच्याकडे करुन द्या असे सांगीतले. त्यावरुन मी त्याच दिवशी कर्मचारी देशपांडे यांना महानगर पालिकेत भेटलो असता त्यांनी माझ्या कडुन बांधकाम परवानगीचा ऑनलाईन अर्ज क्रमांक घेतला. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तुमच्या प्लॉटची बांधकाम परवानगी साठी आयुक्त जावळे साहेबांनी 09,30,000/-रुपये (नऊ लाख तीस हजार) रुपये सांगितलेले आहे. ते तुम्ही द्या असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने आठ दहा दिवसात पैसे डजेस्ट करुन आणुन देतो असे म्हणुन तेथुन निघुन गेलो. मी दिनांक 18/06/2024 रोजी मा. वरिष्ठांच्या सुचनेनूसार न्टी करप्शन ब्युरो कार्यालय छत्रपती संभाजी नगर येथे पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब यांना प्रत्यक्षात भेटुन तोंडी हकीकत सांगीतली व आज दिनांक 19.06.2024 रोजी अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथे तक्रार देण्यासाठी हजर आलो आहे. मला बांधकाम परवानगीसाठी महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त जावळे व कर्मचारी देशपांडे यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी दिनांक 19/06/2024 रोजी आयुक्त जावळे व कर्मचारी देशपांडे यांची महानगर पालिका अहमदनगर येथे जावुन प्रत्यक्ष भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी माझे काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करुन स्वत: किंवा ईतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी हि विनंती. अश्या आशयाची लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेबांनी दोन शासकीय पंचा सोबत माझी ओळख करुन त्यांचा परीचय करुन दिला. मी दिलेली तक्रार त्यांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी व बिडवे साहेबांनी मी दिलेली तक्रार वाचून त्यावर स्वाक्षरी केली आहे.
मी महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त जावळे व कर्मचारी देशपांडे यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे



Scanned with OKEN Scanner

काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी श्री.बिडवे साहेब यांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना दिल्या. पोलीस अंमलदार घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेबांचे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. त्यानंतर मी माझ्या जवळील कारने व पंच श्री.इंगळे हे मी उपलब्ध करुन दिलेल्या मोपेड स्कुटीने अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथुन निघुन महानगर पालिका अहमदनगर येथील आवारात सोबत पोहोचलो.

त्यावेळी आयुक्त जावळे हे त्यांच्या वाहनात बसलेले होते व ते देशपांडे यांचेशी काहीतरी बोलत होते. तेंव्हा आम्ही आयुक्त जावळे यांना भेटण्यासाठी त्यांचे वाहनाकडे जात असतांना ते त्यांच्या वाहनाने मनपा कार्यालयातून बाहेर चालल्या गेले.

त्यानंतर देशपांडे हे त्यांच्या कॅबीनकडे जात असतांना मी पंच क्र.01 श्री.इंगळे यांचे समक्ष देशपांडे यांना भेटलो व म्हणालो की, "देशपांडे साहेब?, पाच इक मिनट द्याना राव, तुम्ही आम्हाला थांगपत्ता लागू देयाना, मला काय म्हणायचं त्या दिवशी तुम्ही होतेच ना..की बबा एवढं एवढं रक्कम दया, नऊ लाख तीस हजार रुपये लई होते ना राव शेखर भाऊ ", त्यावर देशपांडे हे मला म्हणाले की, "मी आयुक्ताकडं विषय काढला होता, त्यांनी मला आठ पर्यंत तयार आहेत "असे म्हणाले. त्यावर मी "आठ काय आठ लाख रुपये का" असे म्हणालो असता त्यावर देशपांडे यांनी "हम्म" असे म्हणुन संमती दिली. त्यावर मी "लई रक्कम होते शेखर भाऊ, माझ्या नावावर फाईल हय, नऊ लाख तीस हजार रुपये कोणते हिशोबान सांगीतले " असे म्हणालो,त्यावर देशपांडे मला म्हणाले की, "युनिटच कॅलक्युलेशन करा", त्यावर मी त्यांना "एकशे सोळा युनिट आहेत" असे बोललो असता देशपांडे मला म्हणाले की, "आता हेच पाच ऐंशी होतात", त्यावर मी "पाच लाख ऐंशी हजार रुपये म्हणजे काय युनिट" असे विचारले असता देशपांडे साहेब "दहा" असे म्हणाले, तेंव्हा मी त्यांना "दहा हजार रुपये युनिट लई पैसे होते, कुठतरी फुटपटटी कमी लावा, आता बोलले ना तुम्हाला काहीतरी ते" त्यावर देशपांडे म्हणतात की, "ते म्हणी मला कळाले की, आठ लाख पर्यंत हाये" असे, त्यावर मी "आठ लाख रुपये" असे म्हणालो असता त्यावर देशपांडे "हम्म" असे म्हणुन पुन्हा संमती दिली. त्यावर मी "देऊन टाकतो चला, आठच्यावर वरती नको आठ लाख रुपये घ्या म्हणा साहेबांना फाईल करुन द्या" असे चर्चा चालु असतांना देशपांडे साहेब हे मला म्हणाले की, "उद्या असलं की तुम्हाला फोन करुन बोलून घेतो." अशी आमची चर्चा झाल्यानंतर मी व पंच क्र.01 श्री.इंगळे असे आम्ही दोघे आप आपल्या गाडीने अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथे परत आलो.

त्यावेळी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पो.अं. घायवट यांनी बंद केला. बिडवे साहेबांनी पंच क्र.01 श्री.इंगळे यांना विचारपूस करुन व व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता त्यामध्ये देशपांडे हे माझ्या कडे मौजे नालेगाव येथील सर्व्हे नं. 1अ+ 1ब+6/3+10/1 मधील प्लॉट नंबर 12 ते 15/3 च्या बांधकाम परवानगीसाठी महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त यांचे करीता 8,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन माझी दि. 20.06.2024 रोजी आयुक्त यांच्या सोबत भेट घालुन देणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन दिनांक 20.06.2024 रोजी महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त पंकज जावळे यांची लाच मागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 20.06.2024 रोजी महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त पंकज जावळे यांची लाच मागणी पडताळणी करण्यासाठी श्री.बिडवे साहेब यांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेबांचे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. त्यानंतर मी माझ्या जवळील कारने व पंच श्री.इंगळे हे मी उपलब्ध करुन दिलेल्या मोपेड स्कुटीने अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथुन निघुन महानगर पालिका अहमदनगर येथील आवारात पोहोचलो व पायी चालत महानगर पालिका येथील आयुक्त यांचे दालना बाहेर थांबलो. तेव्हा तेथे मी कर्मचारी देशपांडे यांची भेट घेऊन मग बोलून घ्याना मग सगळचं विषय संपवू असे म्हणाल्याने देशपांडे हे आयुक्त यांच्या दालनात गेले. त्यानंतर काही वेळाने देशपांडे यांनी आयुक्त यांचे दालनाचे दरवाजातुन मला आत येण्याबाबत खुनावल्याने मी आयुक्त यांच्या दालनात गेलो. त्यावेळी मी आयुक्तांना नमस्कार करुन तुमची माझी भेटच होईना, इतके अडथळे असे म्हणालो असता आयुक्त यांनी मला पंचवीसला भेटण्यास बोलाविले. त्यानंतर मी पाच सहाजण पार्टनर हे आम्ही म्हणजे ही अमाऊंट सांगितली नऊ लाख तीस हजार ती जरा खुप जास्त हे म्हणून मग, देशपांडे साहेब बोलले, चालतं बाकीच बोलतो मी त्यांच्याशी देशपांडे साहेबाशी असे म्हणालो असता त्यावर आयुक्त बोलुन घ्या, असे म्हणुन मान हलवुन होकार दिला. त्यावर मी



Scanned with OKEN Scanner

देशपांडे यांना तुमच्या कडं कधी येऊ असे विचारले असता त्यावर देशपांडे तुम्हाला फोन करतो, निरोप देतो असे म्हणाले. त्यावर मी देशपांडे यांना पेमेंटच विचारले असता दहा वेळेस सांगीतलं तुम्ही दहा दहा वेळेस एकच विषय विचारु राहिले, असं नसतं काळे साहेब, सगळ समजलय, तुम्ही चार वेळेस विचारु राहीले, ते पण चारजणा समोर तिनदा तिनदा विषय काढतां असे म्हणुन तेथुन निघुन गेले. त्यानंतर मी आंधळे नावाचे कर्मचारी यांच्या सोबत कामा संबधाने चर्चा झाल्या नंतर मी व पंच क्र.01 श्री.इंगळे असे आम्ही दोघे आप आपल्या गाडीने अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथे परत आलो. त्यावेळी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार घायवट यांनी बंद केला.

त्यानंतर बिडवे साहेबांनी पंच क्र.01 श्री.इंगळे यांना विचारपूस करुन व व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता त्यामध्ये आयुक्त जावळे हे मौजे नालेगाव येथील सर्व्हे नं.1अ+1ब+6/3+10/1 मधील प्लॉट नंबर 12 ते 15/3 च्या बांधकाम परवानगीसाठी सांगतो असे म्हणुन मान हलवुन होकार देवुन लाचेला प्रोत्साहन देवुन दिनांक 25.06.2024 रोजी भेटण्यास सांगितले. त्यावरुन दिनांक 25.06.2024 रोजी महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त पंकज जावळे व कर्मचारी देशपांडे यांचे विरुध्द सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावरुन मी दिनांक 25.06.2024 रोजी अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथे पोलीस उप अधीक्षक श्री. किरण बिडवे साहेबां समक्ष हजर आलो व महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त पंकज जावळे व कर्मचारी देशपांडे यांच्या बाबत माहिती घेतली असता आयुक्त हे निवडणुक कामात व्यस्त असल्याने तसेच कर्मचारी देशपांडे हे दिनांक 24.06.2024 रोजी पासुन रजेवर असल्याने त्यांचे विरुध्द दिनांक 26.06.2024 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यावरुन मी 26.06.2024 रोजी अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथे पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेबां समक्ष हजर आलो व महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त पंकज जावळे व कर्मचारी देशपांडे यांच्या बाबत माहिती घेतली असता आयुक्त जावळे हे दिनांक 26.06.2024 रोजी पासुन रजेवर असल्याने त्यांचे विरुध्द दिनांक 27.06.2024 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यावरुन मी 27.06.2024 रोजी अहमदनगर येथील हॉटेल अक्षय पॅलेस येथे पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेबां समक्ष हजर आलो व महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त पंकज जावळे व कर्मचारी देशपांडे यांच्या बाबत माहिती घेतली असता ते कार्यालयात हजर नसल्याचे कळाले.

त्यावरुन आज दिनांक 27.06.2024 रोजी मला असे वाटते की, महानगर पालिका अहमदनगर येथील आयुक्त पंकज जावळे व कर्मचारी देशपांडे यांना माझ्यावर संशय आल्याने ते माझी भेट घेण्याचे टाळुन रजेवर गेलेले असल्याने ते आता माझ्या कडून लाचेचे पैसे स्विकारणार नाहीत अशी माझी खात्री झाली आहे. म्हणून मी आज रोजी फिर्याद देत आहे.

तरी मौजे नालेगाव येथील सर्व्हे नं.1अ+1ब+6/3+10/1 मधील प्लॉट नंबर 12 ते 15/3 च्या बांधकाम परवानगीसाठी महानगर पालिका आयुक्त पंकज जावळे यांचे करीता लोकसेवक श्रीधर आत्माराम देशपांडे, वय 48 वर्ष व्यवसाय नोकरी लिपिक

लिपिक टंकलेखक व प्रभारी स्वीय सहायक, महानगर पालिका अहमदनगर (वर्ग-3) रा.बानेश्वर कॉलनी, बंगला क्रमांक 35, राममंदीरा समोर, बुऱ्हाणनगर, अहमदनगर यांनी मला दिनांक 19.06.2024 रोजी 19.04 ते 19.40 वाजेच्या सुमारास महानगर पालिका अहमदनगर येथे पंच श्री.श्रीकांत इंगळे यांचे समक्ष 8,00,000/-रुपये लाचेची मागणी करुन त्यास दिनांक 20.06.2024 रोजी लोकसेवक पंकज जावळे वय 47 वर्ष व्यवसाय नोकरी आयुक्त, महानगर पालिका अहमदनगर (वर्ग-1) मुळ रा.माजलगाव जि.बिड ह.मु.शासकिय निवासस्थान, अहमदनगर यांनी प्रोत्साहन दिले म्हणून आयुक्त पंकज जावळे व कर्मचारी देशपांडे यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी. माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टाईप केली असुन त्यांची प्रिंट काढल्या नंतर मी वाचून पाहिली ती मी सांगीतल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष          ही फिर्याद दिली सही

( किरण बिडवे )
पोलीस उप अधीक्षक
न्टी करप्शन ब्युरो, जालना.



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

AANAND ASHOK KOKARE(I (Inspector)) / DGPAAKM8102 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name**(नाव): I AANAND ASHOK KOI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPAAKM8102



Scanned with OKEN Scanner